# प्रेसनोट दि. २६/०५/२०१९

## सामाजिक सुरक्षा विभागाने केलेल्या दोन वेगवेगळया एक सज्ञान व ३ अल्पवयीन मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका, सामाजिक सुरक्षा विभागाने केली वेश्या व्यवसायातुन सुटका

दिनांक २४/५/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नरेश बलसाने यांचे बातमीवरुन फलॅट नंबर ११, साई अपार्टमेंट, जांभुळ या ठिकाणी छापा टाकुन एक सज्ञान मुलीस वेश्या व्यवसायातुन सुटका करण्यात आली आहे. तिला वेश्या व्यवसायास लावणारा एजंट नामे रॉकी ऊर्फ सुनिल, ऊर्फ मारुती भुनदास मोरे यास दाखल गुन्हयाचे कामी अटक केली आहे. सदर बाबत भारती विदयापीठ पोलीस स्टेशन तपास करीत आहे.

तसेच दि.२५/०५/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार ज्ञानेश्वर देवकर यांचे मार्फत मिळालेल्या माहिती वरुन काळे पडळ, हडपसर, बारवकर बिल्डींग, तळमजला, पुणे या ठिकाणी छापा टाकला असता तेथुन ३ अल्पवयीन मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका करण्यात आली आहे. त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा एजंट पवन महादेव बाजी व दोन महिलांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. एजंट व एक महिला आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. सदर तीन अल्पवयीन मुली या पैकी एका आरोपी महिलेच्या मुली आहेत. ती महिला व मुली अशिक्षीत असुन केवळ पैशाकरीता तिने मुलींना या व्यवसायात टाकले आहे. सदर तीनही मुलींना सुरक्षेकामी ताब्यात घेण्यात आले आहे. सदर बाबत हडपसर पोलीस स्टेशन तपास करीत आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, पोलीस उप निरीक्षक योगिता कुदळे, नामदेव शेलार, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजाराम घोगरे, तुषार आल्हाट, सचिन शिंदे, रेवनसिध्द नरोटे, राजेंद्र ननावरे, सुनिल नाईक, कविता नलावडे, अनुराधा धुमाळ, रुपाली चांदगुडे, सुप्रीया शेवाळे, यांनी कारवाई केली आहे.

( मनिषा झेंडे )
पोलीस निरीक्षक
सामाजिक सुरक्षा विभाग,
गुन्हे शाखा पुणे शहर